काळ्या पाखराचे दिवस

उत्तर इटलीतील लोककथा

लेखक – टॉमी दे पाओला

मराठी अनुवाद – सानिया



काळ्या पाखराचे दिवस

उत्तर इटलीतील लोककथा

लेखक - टॉमी दे पाओला
मराठी अनुवाद - सानिया

खूप खूप वर्षांपूर्वी इटलीच्या उत्तरेकडील डोंगराळ भागात एक सरदार आपली एकुलती एक मुलगी, गेमा, बरोबर राहत असे. सरदाराची बायको खूप आधीच वारली होती. त्याने एकट्यानेच लहानग्या गेमाचे पालनपोषण केले.

शहराच्या मध्यभागी सरदाराची हवेली होती. हवेलीची दारे गरजूंसाठी कायमच उघडी असत. सरदार जेनारो खूप प्रेमळ होता. बुद्धिमान आणि प्रामाणिक गृहस्थ अशी त्याची सर्वदूर ख्याती होती.

दररोज सकाळी सरदार जेनारो हवेलीतल्या सभागृहात जाई आणि भल्यामोठ्या टेबलापाशी बसून लोकांच्या समस्या, तक्रारी ऐकून घेई. गेमा लहान असल्यापासून पाहत आली होती की सरदार प्रत्येकाच्या शंकेचे निराकरण करत. सभागृहात येणारा प्रत्येक माणूस समाधानी चेहऱ्यानेच बाहेर पडे.

दुपारी अभ्यास करून झाल्यावर गेमा आपल्या बाबांसोबत अंगणात बसे.

“*कारा*, माझ्या गोड मुली, आज दिवसभरात तू काय बरं केलंस?” बाबा विचारत. आणि मग दिवसभरातल्या सगळ्या गमतीजमती, वाचलेली नवीन पुस्तकं, मास्तरांनी शिकवलेल्या गोष्टी गेमा बाबांना सांगे.

गेमा आणि सरदार गप्पा मारत बसले की झाडावरचे रंगीबेरंगी पक्षी गाऊ लागत. “अहाहा!” सरदार म्हणे. “*इल कॉन्सेर्तो*, मैफिल, सुरु झाली आहे.” सगळ्या पाखरांच्या किलबिलाटामध्ये एक मंजूळ आवाज कायम लक्ष वेधून घेई. हा मधुर आवाज होता एका पांढऱ्याशुभ्र पक्ष्याचा. गेमा त्याला लाडाने *‘ला कोलंबा’* म्हणे.

गेमासोबत अंगणात बसून पाखरांची गोड गाणी ऐकणे ही सरदार जेनारोच्या आयुष्यातली सर्वात आनंददायी गोष्ट होती.



पण ह्या डोंगराळ भागात हिवाळा खूप लवकर यायचा. बर्फ पडायला सुरुवात झाली की दिवस छोटे होत आणि सारे पक्षी दक्षिणेकडच्या उबदार प्रदेशात उडून जात. सरदार आणि गेमा थंडगार दुपारी सभागृहातल्या शेकोटीपाशी बसून ऊब घेत.

बर्फाचे कमरेएवढ्या उंचीचे ढीग साचायचे. ही कडाक्याची थंडी कधी संपणार की नाही अशी गेमाला भीती वाटू लागे. अश्या वेळी सरदार गेमाची समजूत काढायचे. “गेमा बाळा, काळजी करू नकोस. लवकरच दिवस मोठे होतील. उबदार वाऱ्याच्या झुळुकी आणि स्वच्छ सूर्यप्रकाश सोबत घेऊन *ला प्रिमावेरा*, वसंतऋतु, येईल.”

“मग सगळे पक्षीही परत येतील आणि पुन्हा आपल्याला *इ कॉन्सेर्ती*, मैफिली ऐकायला मिळतील.” गेमा म्हणे.

“हो. मलाही पाखरांच्या मधुर गाण्यांची खूप आठवण येते आहे.”



सरदारांनी सांगितल्याप्रमाणे हळूहळू बर्फ वितळायचा, झाडांना नवी पालवी फुटायची आणि सभागृहाच्या खिडकीमधून *ला कोलंबा* ची सुरेल शीळ पुन्हा कानावर पडायची. हिवाळ्यानंतर सगळ्यात आधी तिचेच आगमन व्हायचे. आणि मग हळूहळू विविध रंगी फुलांनी आणि पक्ष्यांनी अंगण गजबजून जायचे. त्यांचे मधुर कूजन ऐकण्यात सरदार आणि गेमा तासंतास रमून जात.

एका वर्षी उन्हाळा संपल्यावर सरदार आजारी पडले. वैद्यांच्या उपचारांनीही त्यांची तब्येत सुधारली नाही. सरदार अंथरुणाला खिळून राहिले.

“गेमा बाळा, खिडकी उघड. मला *इल कॉन्सेर्तो* ऐकायचे आहे.” ते म्हणाले. पाखरांच्या गाण्यांनी ते तृप्त होत. त्यामुळे रोज दुपारी गेमा त्यांच्या खोलीची खिडकी उघडे आणि दोघे मिळून गाणी ऐकत. पाखरांच्या किलबिलाटातच सरदारांना झोप लागून जाई.

हळूहळू दिवस छोटे झाले आणि गार वारे वाहू लागले. हिवाळ्याची चाहूल लागली. पहाटे बर्फाच्या बारीक भुरभुरीने अंगण पांढरेशुभ्र होऊन जाई. काही पक्षी दक्षिणेकडच्या प्रवासाला निघालेले गेमाने पहिले.



"*कारीस्सिमी,* प्रिय पाखरांनो, कृपा करून उडून जाऊ नका. तुमची गोड गाणी ऐकून माझे बाबा नक्कीच बरे होतील. तुमच्या किलबिलाटाने त्यांना प्रसन्न वाटतं. मी तुम्हाला दाणे देईन. झाडांना टोपल्या बांधीन. तुम्हाला सुरक्षित आणि उबदार ठेवीन. *रिस्ताते, वि प्रेगो.* प्लीज रहा."

गेमाने पाखरांसाठी ताटलीत दाणे ठेवले. झाडाच्या फांद्यांना टोपल्या बांधल्या. पाखरांना ऊब मिळावी म्हणून मऊमऊ लोकरीची गादी तयार केली.

पक्षी रोज गाणी गात. त्यांच्या मंजुळ आवाजाने सरदारांना खूप आनंद होई. पण त्यांच्या तब्येतीत मात्र फारशी सुधारणा होत नव्हती.

डिसेंबर महिना आला तशी मोठी हिमवादळे सुरु झाली. आणखी पक्षी उडून गेले. *ला कोलंबा* मात्र थांबली. गेमा आणि तिच्या वडिलांसाठी ती आपल्या मंजुळ आवाजात गाणी गात राहिली.

नाताळचा सण जवळ आला. दरवर्षी गेमा आणि सरदार या सणाची आतुरतेने वाट पहायचे. त्या दिवशी शहरातली सगळी मुलं मेजवानीसाठी सभागृहात यायची. मेजवानीमध्ये *पानेतोने* (इटलीतला गोड पावाचा प्रकार), हॉट चॉकलेट आणि सर्वांसाठी भरपूर भेटवस्तू असत. पण यावर्षी तर सरदार पार अंथरुणाला खिळले होते. त्यांनी गेमाला आपल्याजवळ बोलवून घेतले आणि म्हणाले, “बाळा, यावर्षीच्या नाताळ सणाला तू माझी जागा घेतली पाहिजेस. सभागृहात जाऊन सर्वांना शुभेच्छा दे आणि लहान मुलांमध्ये भेटवस्तू वाट.” गेमाने सरदारांच्या इच्छेप्रमाणे सारे काही केले. *ला कोलंबा* आणि इतर उरल्यासुरल्या पक्ष्यांनी मिळून नाताळ सणाचे एक छानसे गाणेही गायले.

नाताळानंतर भरपूर हिमवर्षाव झाला. *एपिफेनिया* (६जानेवारीला साजरा केला जाणारा इटलीतील एक सण) संपता संपता तर जवळपास सारेच पक्षी निघून गेले. धारदार आवाजाचे पिवळे पक्षी आणि बासरीसारखी मंजुळ शीळ घालणारी निळी पाखरे सारेच गायब झाले. पिवळेजर्द, निळेशार, हिरवेगार, लालबुंद असे सगळेच पक्षी दक्षिणेकडे उडून गेले.

अखेर जानेवारीच्या मध्यावर सतत चिवचिवणारे तांबूस रंगाचे पक्षीही निघून गेले. *ला कोलंबा* तेवढी मागे राहिली.

सरदारांच्या संगीतप्रेमाबद्दल माहिती असणारे त्यांचे मित्रमैत्रिणी अंगणात येऊन त्यांच्यासाठी गाणी गात. पण त्यांना पाखरांची सर कशी येणार. त्यांचे मोठाले आवाज आणि संगीत ऐकून सरदाराचं डोकं दुखू लागे.

गेमा उबदार स्वेटर घालून बागेत गेली.

“*कोलंबा*, प्लीज रहा.” ती म्हणाली. “मला माझे बाबा खूप आवडतात. डॉक्टरकाका म्हणाले की त्यांना बरं होण्यासाठी उबदार वसंतऋतुची गरज आहे. तुझी मधुर गाणी त्यांच्या मनाला उभारी देतात. वसंत ऋतु लवकरच येईल याची आशा देतात. प्लीज आम्हाला सोडून जाऊ नकोस.”



ला कोलंबा राहिली.

आता जानेवारी महिना संपत आला होता. वर्षातले हे सर्वात थंड दिवस. थंडगार वारे हिमशिखरांवर थैमान घालू लागले. शहरातली घरं थंडीने गारठून गेली.



तरीदेखील दररोज दुपारी गेमा खिडकीची जराशी फट उघडे. आपल्या बाबांचा अशक्त हात हातात घेऊन ती त्यांच्यासोबत *ला कोलंबा*ची मंजुळ गाणी ऐके.





२८ जानेवारीला हवा आणखीनच बिघडली. गेमाने तिच्या बाबांना सभागृहातल्या शेकोटीपाशी बसवले. बाहेर लोकरीच्या टोपलीत बसलेली *ला कोलंबा* थंडीने कुडकुडू लागली. गेमाने खिडकी उघडल्याबरोबर ती खिडकीच्या कठड्यावर जाऊन बसली. सभागृहातल्या शेकोटीमुळे तिला उबदार वाटू लागले. *ला कोलंबा* ने गायला सुरुवात केली. अंधार पडेपर्यंत ती गातच राहिली.

त्यानंतर ती उडत उडत धुराड्यापाशी गेली. खाली पेटलेल्या शेकोटीची ऊब धुराड्याच्या विटांपर्यंत पोहचत होती. त्या उबदार जागेत *ला कोलंबा* झोपी गेली. पुढचे दोन दिवस तिने धुराड्यातच मुक्काम ठोकला. फक्त खाण्यासाठी आणि सरदार जेनारोसाठी गाणी गाण्यासाठी ती तिथून बाहेर पडत असे. तापाने फणफणलेला सरदार अर्धवट ग्लानीत होता. गेमा दिवसरात्र त्यांच्या उशाशी बसून होती.

अखेर तिसऱ्या दिवशी *ला कोलंबा* शीळ घालत खिडकीच्या दिशेने झेपावली. तो जानेवारी महिन्याचा शेवटचा दिवस होता. *ला कोलंबा* चा आवाज कानावर पडताच गेमाने खिडकी उघडली.

धुराने काळेकुट्ट झालेले ते पाखरू पाहून तिचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. "*ला मेर्ला*, काळं पाखरू!" गेमा ओरडली. पण त्या पाखराने गायला सुरुवात केल्याबरोबर गेमाची खात्री पटली की ते पाखरू म्हणजेच *ला कोलंबा* होती.

सरदारांनी डोळे उघडले आणि तीन दिवसांनंतर पहिल्यांदाच ते उठून बसले. अशक्त आवाजात ते पुटपुटले, “माझ्या पाखराचं गाणं.”

“धन्यवाद काळ्या पाखरा!” गेमा म्हणाली. “तुझ्या गाण्यांमुळेच माझ्या बाबांचा जीव वाचला. ते या आजारपणातून खडखडीत बरे होतील याची मला खात्री आहे.”

ला मेर्ला धुराड्याच्या दिशेने उडून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी उंच पहाडांमधून उबदार वाऱ्याची एक झुळूक आली. गेमाला वसंत ऋतूची चाहूल लागली. वर्षातले सर्वात थंड असे तीन दिवस आता सरून गेले होते. पण *ला कोलंबा ला मेर्लाच* राहिली. तिच्या पिसांचा रंग पुन्हा कधीच पालटला नाही.



नववर्षाच्या पहिल्या उबदार दिवशी गेमा आणि तिचे बाबा अंगणात गेले. पहिले एक लाल पक्षी आला. त्याच्यापाठोपाठ निळा, पिवळा, हिरवा असे सारेच आले. *ला मेर्ला* त्यांची केव्हापासून वाट बघत होती. पुन्हा एकदा तऱ्हेतऱ्हेच्या पाखरांच्या किलबिलाटाने अंगण भरून गेले.

तेव्हापासून *ला कोलंबा* आणि तिच्या पिल्लांना *ला मेर्ला* म्हणून ओळखले जाऊ लागले. तिच्या सन्मानार्थ सरदारांनी घोषणा केली की यापुढे जानेवारी महिन्याचे शेवटचे तीन दिवस ‘*ले जिओर्नाते देला मेर्ला,* काळ्या पाखराचे दिवस’, म्हणून ओळखले जातील.

उत्तर इटलीच्या डोंगररांगांमध्ये आजदेखील असे म्हटले जाते.